तरुण भारत संवाद

# जीवन ज्योत माध्यमिक प्रशालेत सायबर सुरक्षेचे मार्गदर्शन

**प्रतिनिधी**
अंत्रोळी

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कंदलगाव येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणक शास्त्र संकुल, क्वीक हिल फाउंडेशन पुणे आणि जीवन ज्योत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला, कंदलगाव येथे सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा कार्यक्रम घेण्यात आला.

जीवन ज्योत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेचे प्राचार्य पी. एम. कमळे अध्यक्षस्थानी होते. यावेळी संगणक शास्त्र संकुलातील राहुल शिंदे व मोहिनी दुधाळ यांनी सांगितले की, फसवणूक होऊ नये म्हणून त्याबद्दल खात्री करूनच त्यावर विश्वास ठेवावा. त्यासाठी ओटीपी कोणास सांगू नये, अनोळखी नंबरवरून आलेले फोन कॉल्सची पडताळणी करावी. इतर व्हॉट्सॲप व सोशल मीडियावर आलेल्या मेसेजेस व लिंकची शहानिशा करूनच पुढील प्रक्रिया करावी. पासवर्ड स्ट्रॉंग वापरून स्वत:ची माहिती सुरक्षित करावी. त्यासाठी मोबाईल, कॉम्प्युटर, लॅपटॉप आदी साधनांवर अधिकृत अँटीव्हायरसचा वापर करावा. या कार्यक्रमासाठी जीवन ज्योत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेतील एकूण ३८२ विद्यार्थिनींनी आपला सहभाग नोंदविला होता. यावेळी जीवन ज्योत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेचे प्राचार्य पी. एम. कमळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी जीवन ज्योत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग आणि प्रशालेतील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. प्रशालेचे शिक्षक अनिल गावडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रशालेचे शिक्षक अरुण गावडे यांनी आभार मानले.



**कंदलगाव : येथील जीवन ज्योत माध्यमिक प्रशालेत सायबर सुरक्षेचे मार्गदर्शन प्रसंगी उपस्थित विद्यार्थिनी.**